# प्रेसनोट

दि.२६/११/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७, |
| आरोपीचे नांव व कार्यालय | डॉ.रजनी रामदास खुणे, धंदा–नोकरी, जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालय, चितळेरोड अहमदनगर, वय ५७ वर्षे, वर्ग–२, रा. सिव्हील हडको, हिंगणे यांचे मालकीचे घरात भाडयाने, निसार हॉस्पीटल शेजारी, ता.जि.अहमदनगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ८४,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ८०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील आरोपी लोकसेविका डॉ.रजनी रामदास खुणे, वय ५७ वर्षे, जिल्हा हिवताप अधिकारी, अहमदनगर यांचे अधिपत्याखाली संगमनेर तालुक्यामध्ये तक्रारदार हे प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये आरोग्य सहा. म्हणुन नोकरीस असुन ते दि.०१/०९/२०१४ ते दि. १६/०१/२०१५ मध्ये आरोग्य रजेवर होते. सदर कालावधीचे वेतन त्यांना अदयाप पावेतो मिळाले नव्हते. ते वेतन मिळण्यासाठी त्यांनी जिल्हा हिवताप अधिकारी, यांचेकडे अर्ज दिला होता. त्यावरुन आरोपी लोकसेविका यांनी त्यांचे १,३९,०००/– हजार रुपयांचे रजा कालावधीचे बील मंजुर करुन त्यांचे बॅक खातेवर जमा केले होते. सदरचे वेतन मंजुर करुन बॅक खात्यात जमा केलेच्या मोबदल्यात आरोपी लोकसेविका खुणे यांनी तक्रारदाराकडे वेतनाचे ६०टक्के रक्कम (रु. ८४०००/–)ची लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना आरोपी लोकसेविका यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांचेकडे सपर्क करुन आरोपी लोकसेविका विरुध्द लाचमागणीची तक्रार दिली.त्या तक्रारीच्या अनुशंघाने आज दि. २६/११/२०२० रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका डॉ. रजनी रामदास खुणे, यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ८४,०००/– रुपये लाचेची मागणी केली. व त्यानुसार आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान ८०,०००/– रुपये लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडून पंचासमक्ष जिल्हा हिवताप कार्यालयामध्ये स्विकारली असता आरोपी लोकसेवीका खुणे यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००


26.11

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर